# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक ०७ मार्च, २०१८ / फाल्गुन १६, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३) पर्यावरण मंत्री** | |
| **(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### गडचिरोली जिल्हयातील अनेक तालुक्यांमध्ये फ्लोराईड युक्त पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(१) * १०९२१३ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.चरण वाघमारे (तुमसर), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील आरमोरी तालुक्यातील पाटणबोडी, कुरखेडा तालुक्यातील गवळीटोला, चिचटोला, कोरची तालुक्यातील नागपूर, रानवाही, कासरबोडी, अहेरी तालुक्यातील करनेली, आंबेझरी, भामरागड तालुक्यातील

धोडराज झारेगुड, सिरोंचा तालुक्यातील पोचमपल्ली, मुत्तापूर माल तसेच चामोर्शी तालुक्यातील नवग्राम येथील पाण्यात भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या अहवालानुसार फ्लोराईडचे प्रमाण मानकापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथील नागरिकांचे आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार सदर जिल्हयातील नागरिकांना शुध्द पिण्याचे पाणी मिळण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नामध्ये नमूद केलेल्या १३ गावांमधील एकूण ११३ उद्भवांच्या पाणी नमुन्यांची माहे एप्रिल २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत रासायनिक तपासणी करण्यात आली. तपासणीअंती करनेली व आंबेझरी (ता.अहेरी), झारेगुडा (ता.भामरागड), पोचमपल्ली (ता.सिरोंचा) व नवग्राम (ता.चार्मोशी) या ५ गावांमध्ये प्रत्येकी १ व धोदराज (ता.भामरागड) या गावामध्ये ०४ या प्रमाणे एकूण ०९ पाणी नमून्यांमध्ये फ्लोराईडचे प्रमाण मानकापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे.

इतर ०७ गावांतील पाणी नमून्यांमध्ये फ्लोराईडचे प्रमाण मानकापेक्षा जास्त असल्याचे आढळून आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) संबंधित गावात पर्यायी दुस-या पिण्याच्या पाण्याच्या उद्भवाची व्यवस्था केली असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका उद्भवलेला नाही. तसेच दुषित उद्भवाचे पाणी पिण्यास वापरू नये असा फलक उद्भवाच्या बाजूला लावण्याच्या सूचना संबंधित ग्रामपंचायतींना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## नाशिक जिल्हयातील महानगरपालिका व शासकीय रुग्णालयातील रुग्णांना नियमित ऑक्सिजनचा पुरवठा होत नसल्याबाबत

**(२) * १०५५०३ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगर पालिका, नाशिक अंतर्गत सातपूर भागात अतिदक्षता विभागातील रुग्णांना जीवदान देणारा ऑक्सिजन पुरवठा योग्य प्रकारे होत नसल्याने दिनांक ११ जानेवारी २०१८ रोजी वा त्या सुमारास शहरातील तीन पैकी दोन कंपन्यांवर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाशिक येथील शासकीय रुग्णालयात नवजात बालकांना तसेच अतिदक्षता विभाग आणि आपत्कालीन विभागात दाखल होणाऱ्या रुग्णांना ऑक्सिजनची आवश्यकता असताना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये ऑक्सिजनची तीव्र टंचाई निर्माण झाली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील वर्षी देखील वेल्डिंग चा गॅस वापरल्याने महानगर पालिकेच्या रुग्णालयातील रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास शहरातील रुग्णालयांना अतिदक्षता विभागासाठी ऑक्सीजनची नितांत गरज असून देखील ऑक्सीजन उत्पादन व पुरवठा करणाऱ्या कंपन्यांवर अन्न व औषधे प्रशासनाने केलेली कारवाई ही संशयास्पद असल्याने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी शासनाने केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) नाशिक शहरातील कोणत्याही रुग्णालयात मेडीकल ऑक्सिजनचा तुटवडा असल्याचे प्रशासनाच्या निर्दशनास आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात स्वस्त धान्य दुकानातून वितरीत होणाऱ्या धान्याचे परस्पर वाटप होत असल्याबाबत

**(३) * १०८६९५ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात स्वस्त धान्य दुकानातून अन्न सुरक्षा योजना, अंत्योदय योजना व शेतकऱ्यांसाठी दरमहा वितरीत होणाऱ्या पाच टन तांदुळाचे परस्पर वाटप करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, मागील अनेक दिवसांपासून रेशन दुकानामध्ये प्रत्येक ५० किलोच्या पोत्यात दोन-तीन किलो गहु, तांदूळ कमी येत असल्याच्या तक्रारी रेशन दुकानदाराकडून करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत वैजापूर येथील शासकीय धान्य गोदामामध्ये ग्राहक कल्याण सल्लागार समिती मार्फत तपासणी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले, त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) वैजापूर शासकीय धान्य गोदामास राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षांनी दि. ०१/०६/२०१७ रोजी भेट देऊन गोण्यांमध्ये ५० किलो पेक्षा कमी धान्य असल्याची बाब निदर्शनास आणली. यास्तव जिल्हा पुरवठा

कार्यालयातील लेखाधिकारी व इतर यांनी दि. ०२/०६/२०१७ रोजी गोदामास भेट देऊन तपासणी केली असता, सरासरी तांदूळ २६ क्विंटल व गहू ११ क्विंटल ६६ किलो कमी आढळला आहे. याबाबत तहसिलदार, नायब तहसिलदार व गोदामपाल यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असुन त्यांनी केलेल्या खुलाश्याच्या अनुषंगाने पुढील चौकशी सुरु आहे. त्याचप्रमाणे तालुक्यातील सहा शिधावाटप दुकानदारांनी नायब तहसिलदार (पुरवठा), वैजापूर यांना समक्ष भेटून धान्य कमी मिळत असल्याबाबत तोंडी तक्रार केली होती. यास्तव शिधावाटप दुकानदारांच्या समक्ष गोदामातील धान्याचे मोजमाप केले असता, धान्य बरोबर आढळले. संबंधित दुकानदारांनी लेखी अर्ज देऊन तक्रार मागे घेतली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करळगांव (ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ) येथील पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाले नसल्याबाबत

**(४) * ११०६५२ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करळगांव (ता बाभुळगांव, जि.यवतमाळ) येथे मंजूर करण्यात आलेल्या राष्ट्रीय पेयजल पाणी पुरवठा योजनेला संपुर्ण निधी वितरीत करण्यात आला असूनही पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्ण असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय पेयजल योजनेमध्ये मंजूर असलेले पाणीपुरठा योजनेचे काम निधी वितरीत होवूनही अजूनपर्यत पूर्ण न करण्यात आल्याने तेथील नागरिकांना पाणी टंचाईस सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुसार दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे अथवा येत आहे, तसेच अपुर्ण पाणी पुरवठा योजना कधीपर्यत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदर कामाकरीता वितरीत करण्यात आलेल्या पहील्या हप्त्याच्या रकमेतुन योजनेचे ४०% काम पुर्ण झालेले आहे. समितीच्या अंतर्गत वादामुळे उर्वरीत काम अपुर्ण आहे. तथापि, सदर गावात अस्तित्वात असलेल्या जुन्या नळ योजनेवरुन एक दिवस आड पाणीपुरवठा सुरु असुन गावात तीन सार्वजनिक विहीरी तसेच ५ हातपंपावरुन पाणीपुरवठा सुरु आहे.

(३) गावातील समितीच्या अंतर्गत वादामुळे योजनेच्या कामात विलंब झाला असुन समितीतील अंतर्गत वाद मिटवून नवीन समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीस दुसरा हप्ता जानेवारी, २०१८ मध्ये अदा करण्यात आला असुन योजना मार्च २०१८ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील सर्व तालुक्यातील स्वस्त धान्य केंद्रामध्ये निकृष्ट दर्जाचा मका विक्री होऊन ग्राहकांची होत असलेली फसवणूक

**(५) * १११०४२ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील सर्व तालुक्यातील स्वस्त धान्य केंद्रामध्ये निकृष्ट दर्जाच्या मक्याची विक्री करुन ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयातील माढा तालुक्यासाठी डिसेंबर, २०१७ या महिन्यात २४४९ क्विंटल व जानेवारी, २०१८ महिन्यात १८०० क्विंटल मका उपलब्ध करून दिला जाणार होता यासाठी सर्व स्वस्त धान्य दुकानदारांनी चलनाव्दारे पैसे भरून मागणी नोंदविली होती, त्यानुसार पुरवठा विभागाने दुकानदारांना परमीटदेखील दिलेले असताना गेल्या दोन महिन्यापासून स्वस्त धान्य दुकानदारांना मक्याचा पुरवठा होऊ शकलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शेतकऱ्यांकडून चांगल्या प्रतीचा मका कमी भावामध्ये खरेदी करूनही स्वस्त धान्य केंद्रांमध्ये खराब झालेला मका वितरित होत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत लाभार्थी यांनी स्वस्त धान्य केंद्र चालक यांना यासंबंधी विचारणा केली असता त्यांनी शासनाने पुरवठा केलेला मकाच त्यांच्यामार्फत ग्राहकांना वितरित करण्याशिवाय दुसरा पर्याय नसल्याचे सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, स्वस्त धान्य दुकानातून धान्य घेणारी कुटुंब सामान्य असून संबधित ठेकेदारांनी मका वितरीत केला नसल्यामुळे संबंधित ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार चांगल्या दर्जाचा मका तातडीने उपरोक्त केंद्रामध्ये पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.
(२) होय.

परंतु, लवकरच पुरवठा करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.

अशाप्रकारच्या कोणत्याही तक्रारी अथवा निवेदने रास्तभाव धान्य दुकानदारांकडून प्राप्त झालेल्या नाहीत.

(५) व (६) होय. वाहतुकदारांकडून खुलासा मागविण्यात आला असून, विलंबाबाबत कारवाई करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

-----------------

## रोहिणखेड (ता.मोताळा, जि.बुलडाणा) व १२ गावाची पाणी पुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(६) * १११४७५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहिणखेड (ता.मोताळा, जि.बुलडाणा) व १२ गावाची पाणीपुरवठा योजना कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे यंत्रसामुग्रीत वारंवार बिघाड होत असल्याने मागील १५ दिवसांपासून बंद असल्याची बाब दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच उक्त ठिकाणच्या योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करणेबाबत व योजनेचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

योजनेची पंपींग मशिनरी दि. २३/१/२०१८ रोजी नादुरुस्त झाल्याने पाणी पुरवठा बंद होता. तसेच दि. २९/१/२०१८ रोजी महावितरण द्वारे विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला होता. तो दि. २/२/२०१८ पासून जोडण्यात आल्यानंतर, दिनांक ३/२/२०१८ पासून योजनेतून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(२) योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी, सदर योजनेच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. दरम्यान, योजनेत सर्व समाविष्ट ग्रामपंचायतींना योजनेची पुढील कामे व देखभाल दुरुस्ती सुरु ठेवण्यासाठी शिखर समिती स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच एप्रिल, २०१७ पासून पाणीपट्टी थकबाकीची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे भरणा करणेबाबत संबंधीत ग्रामपंचायतीना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात एनएबीएल मानांकित असलेल्या प्रयोगशाळांची संख्या वाढविण्याबाबत

**(७) * १०५४५७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात फूड सेफ्टी अॅण्ड स्टॅण्डर्ड (एफएसएस) नियमावलीनुसार अन्न तपासणीचा निकाल संबंधित अधिकाऱ्याने ९० दिवसात लावणे अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच महाराष्ट्र राज्यातील १५ अन्न प्रयोगशाळा पैकी केवळ एका प्रयोगशाळेला नॅशनल अॅक्रेडेशन बोर्ड फॉर टेस्टिंग अॅन्ड् कॅलिब्रेशनचे (एनएबीएल) दर्जा मिळाला असून त्याबाबत कॅगच्या अहवालात आक्षेप घेतला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास इतर १४ प्रयोगशाळांना दर्जा विश्वासार्हता नियामकानुसार नसण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सन २०११ ते २०१६ या कालावधीत राज्यात एनएबीएल चे मानांकन असलेली एकच प्रयोगशाळा असल्याने सुमारे ६९४ प्रकरणे प्रलंबित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाने राज्यातील प्रयोगशाळांना एनएबीएल मानांकन माहे ऑक्टोबर, २०१६ च्या योजनेनुसार आवश्यक असल्याचे सांगण्यात येऊन दोन वर्षाचा कालावधी होऊनही त्याची अंमलबजावणी शासनाने केली नाही, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(७) असल्यास, प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा करण्याकरिता एनएबीएल मानांकित असलेल्या प्रयोगशाळांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

तथापि, दिनांक २७/१२/२०१७ च्या दैनिक सकाळ मध्ये अशा आशयाचे वृत्त प्रकाशित झाले होते.

(२) कॅग ने त्यावेळीच्या वस्तुस्थितीत केवळ एक प्रयोगशाळा एनएबीएल नामांकित असल्याचे अहवालात नमूद केले आहे. महाराष्ट्र राज्यात १५ अन्न प्रयोगशाळापैकी अन्न व औषध प्रशासनाच्या दोन व आरोग्य विभागाची एक अशा एकूण ३ प्रयोगशाळा एनएबीएल नामांकित आहेत.

(३) अन्न व औषध प्रशासनाच्या २ प्रयोगशाळा एनएबीएल नामांकित आहेत.

आरोग्य विभागाच्या उर्वरीत प्रयोगशाळेचे एनएबीएल नामांकनाच्या प्रक्रीयेसाठी त्यांना सूचित केले आहे.

(४) हे खरे नाही.

(५), (६) व (७) अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या कलम ४३ नुसार अन्न चाचणी प्रयोगशाळेस एनएबीएल मानांकन घेणे आवश्यक आहे. तथापि अन्न सुरक्षा व मानके २००६ च्या कलम ९८ नुसार अन्न भेसळ प्रतिबंधीत कायदा १९५४ मध्ये अस्तित्वात असलेल्या सर्व अन्न चाचणी प्रयोगशाळा या नवीन कायद्याप्रमाणे अधिसूचित करण्यात आलेल्या आहे. प्रशासनाच्या मुंबई, नागपूर व औरंगाबाद या तीन प्रयोगशाळांपैकी मुंबई व नागपूर येथिल प्रयोगशाळेस एनएबीएल नामांकन मिळालेले आहे. तसेच औरंगाबाद येथील प्रयोगशाळेस एनएबीएल नामांकनासाठी प्रक्रिया सुरु केली आहे.

या व्यतिरीक्त आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील आरोग्य प्रयोगशाळेत देखिल अन्न नमुने तपासले जातात. त्यापैकी राज्य आरोग्य प्रयोगशाळा पुणे ही एनएबीएल मानांकन प्राप्त आहे.

----------------

# मराठवाडयातील राष्ट्रीय पेयजल योजनेमधील २३२ योजनांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(८) * ११०२०८ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील राष्ट्रीय पेयजल योजनेत निधी अभावी आराखडे वेळेत मंजूर न झाल्यामुळे योजना अपूर्ण राहत होत्या तथापि २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी २३३ योजनाचा आराखडा मंजूर झाला तरीही अद्याप निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या २६६ योजना सुरू असल्या तरीही त्यापैकी २३२ योजनांची कामे प्रलंबित आहेत तर आजमितीस ४१ कामे पूर्ण झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडयात २०१० पूर्वी भारत निर्माण योजनेत मंजूर झालेल्या व नंतर त्या राष्ट्रीय पेयजल योजनेत समाविष्ट केलेल्या ६६ गावे/वाडयाच्या ६२ योजना असून त्यापैकी केवळ ४ योजना पूर्ण झाल्या असून उर्वरित ५८ योजना अजूनही प्रलंबित आहेत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, राष्ट्रीय पेयजल योजनेच्या २३३ नव्या योजनांच्या मराठवाडयातील काही जिल्हयात अद्याप निविदाही निघाल्या नाहीत त्यामुळे ४९ कोटी रूपयांचा निधी अखर्चित आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास काही जिल्हयात सदरहू २३३ नव्या योजनांच्या निविदाही न काढण्याची कारणे काय आहेत,तसेच मराठवाडयातील प्रलंबित असलेल्या २३२ राष्ट्रीय पेयजल योजनांची कामे शीघ्र गतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

कृती आराखडा सन २०१७-१८ मध्ये समावेश असलेल्या नवीन २३३ योजनांपैकी २७ योजनांच्या बाबतीत कार्यारंभ आदेश निर्गमित झाले असून, ११ योजनांची निविदा प्रक्रिया सुरु आहे. उर्वरीत ७८ योजनांना प्रशासकीय

मान्यता देण्यात आली असून, निविदा प्रक्रिया शिल्लक आहे. ६७ योजनांची अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून, ५० योजनांची अंदाजपत्रके तयार करणे सुरु आहे.

(२) हे अशंत: खरे आहे.

जुन्या २६६ योजनांपैकी जानेवारी २०१८ अखेर ६९ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत.

(३) हे अशंत: खरे आहे.

राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमात भारत निर्माण अंतर्गत मंजूर असलेल्या ६७ योजना असून, त्यापैकी जानेवारी २०१८ अखेर १२ योजना कार्यन्वित केल्या आहेत. उर्वरीत ५५ योजना प्रलंबित आहेत.

(४) हे अशंत: खरे आहे.

जानेवारी २०१८ अखेर रु. २५.११ कोटीचा निधी उपलब्ध आहे. तथापि, हा निधी केवळ नवीन योजनांसाठी नसून प्रगतीपथावरील योजना पुर्ण करण्यासाठीही आवश्यक आहे.

(५) व (६) २३३ नवीन योजनांपैकी निधीच्या उपलब्धतेनुसार जानेवारी, २०१८ अखेर २७ योजनांची कामे सुरु केलेली असून ११ योजनांची निविदा प्रक्रीया सुरु आहे. उर्वरीत योजनांपैकी प्रशासकीय मान्यता झालेल्या योजनांच्या निविदा काढण्याची कार्यवाही अपूऱ्या निधीमुळे प्रलंबित आहे. सन २०१७-१८ या वर्षाच्या कृती आराखडयात नवीन समाविष्ट असलेल्या परंतू कामे सुरु न झालेल्या योजनांचा समावेश आवश्यकतेनुसार सन २०१८-१९ च्या आराखडयात करुन ही कामे शीघ्र गतीने सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीपासून राज्यातील शाळांमध्ये लेक वाचवा, लेक शिकवा अभियान राबविण्याबाबत

**(९) * १०५२९९ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राहुल जगताप**

**(श्रीगोंदा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.प्रदीप नाईक (किनवट), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीपासून शाळांमध्ये लेक वाचवा, लेक शिकवा अभियान राबविण्याबाबत शासनाकडून रुपये ४० लाख ८० हजारांचा निधी राज्यातील शाळांना देण्यांत आला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३ ते २६ जानेवारी या कालावधीत रोज मुलींच्या शिक्षणासंदर्भात उपक्रम राबविण्याच्या सूचना विद्याप्राधिकरणाने दिल्या असून हे उपक्रम राबवून घेण्याची जबाबदारी राज्यातील ४०८ शहर साधन केंद्रावर (यूआरसी) सोपविण्यात आली असल्याने या कार्यक्रमाकरिता प्रत्येक केंद्रास १० हजार या प्रमाणे ४०८ शहर साधना केंद्राना ४० लाख ८० हजार रुपयांचा निधी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानातून गट शिक्षणाधिकारी यांना देण्यात आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्हयातील शाळांनी कोणतेही अभियान राबविले नसल्याच्या तक्रारी खाजगी संस्थांनी शासनाच्या जिल्हा परिषद विभागाकडे केल्या असून अन्य जिल्हयातील शाळांनीही अभियानाची अंमलबजावणी केली नाही, विशेषत: शिक्षण विभाग आणि जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यवसायिक विकास संस्थेकडूनही (डायट) शाळांच्या या कृतीबाबत कोणतीही विचारणा केली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील मुलींना शिक्षण साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी सदर शैक्षणिक साहित्य लोकसहभागातूनच शिक्षकांनी मिळवावे यासाठी शिक्षकांना आर्थिक मदत उपलब्ध करु शकतील अशा गावातील ग्रामपंचायत, बँका, पतसंस्था आणि  दानशुर नागरिकांकडून शालेय गरजेच्या वस्तू मुला-मुलींना वाटण्यासाठी मिळवाव्यात अशा सूचना शिक्षण विभागाने दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास शाळांना केल्या असल्याने या नविन सूचनेमुळे शिक्षकांवर देणगीदार शोधण्याचे काम वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शाळेतील वर्ग डिजिटल करणे, शाळेत पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी निधी गोळा करण्याचे काम शिक्षकांनी पूर्ण करताच पुन्हा शिक्षण विभागाने उक्त नवीन परिपत्रक काढल्याने विद्यार्थ्यांच्या शालेय शिक्षणावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) सदर निधी राज्यातील शाळांना दिलेला नसून तालुका स्तरावर कार्यक्रम आयोजनासाठी जिल्हा शैक्षणिक व सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था यांच्यामार्फत गटशिक्षणाधिकारी यांना दिलेला आहे.

(२) होय.

(३) नाही.

(४) हे खरे नाही.

(५) नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे विद्यापीठ आणि महाविद्यालयातील उपहारगृह अन्न व औषध प्रशासनाचा परवाना न घेताच सुरु असल्याबाबत

**(१०) * १०५८९० प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विद्यापीठ आणि महाविद्यालयातील उपहारगृह अन्न व औषध प्रशासनाचा परवाना न घेताच सुरु असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे विद्यापीठात भोजनालयातील अन्नाचा दर्जा चांगला नसल्याबाबतची तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे तसेच भोजनालयातील अन्नाचा दर्जा तसेच आकारण्यात येणारे दर याबाबत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमार्फत आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार ज्या विद्यापिठातील अथवा महाविद्यालयातील उपहारगृह परवाना न घेताच सुरु आहेत अशा उपहारगृहावर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सदर कॅन्टीन विनापरवाना नाही. तथापि सप्टेंबर २०१७ मध्ये पुणे विद्यापीठ, पुणे येथील मे. आदर्श कॅन्टीन, पुणे विद्यापीठ, पुणे या पेढीची तपासणी करण्यात आली व पेढीस सुधारणा नोटीस पाठविण्यात आली होती. त्या अनुषंगाने त्रुटींची पूर्तता न केल्यामुळे या पेढीचा परवाना ०५ दिवसांसाठी निलंबित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील गरीब शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता शैक्षणिक कर्ज उपलब्ध करण्याबाबत

**(११) * १०६६७३ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उच्च शिक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्यात येणारे शैक्षणिक कर्ज सन २०१६ पासून बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०१६ पूर्वी उच्च शिक्षण घेणाऱ्या ४५० ते ५०० विद्यार्थ्यांना मंजूर झालेले कर्ज अद्यापि उपलब्ध झाले नाही तर साधारणतः १०००० ते १५००० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कमही मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भासह इतर ग्रामीण आणि शहरी भागातील गरीब गरजू शेतकरी आदिवासी विदयार्थी उच्च शिक्षण घेत असून निसर्ग संकट, गारपीट, अवर्षण, अवकाळी वादळ, पिकावरील रोग, बोंड आळी, हवामानातील बदलामुळे पिकांचे होणारे नुकसान यामुळे शेतकरी आणि गरीब कर्जबाजारी झाले असून मंजूर झालेले कर्जसुद्धा अप्राप्त असल्याने उक्त विद्यार्थ्यांचे शिक्षणावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत उच्च शिक्षणाकरीता शैक्षणिक कर्ज देण्याची कोणतीही योजना राबविण्यात येत नाही.

(२) तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सन २०१६-१७ मधील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील एकूण १,५४,७५० विद्यार्थ्यांना एकूण रु.४७१.३९ कोटी शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम वितरीत करण्यात आली असून सन २०१६-१७ पर्यंत या योजनेंतर्गत रक्कम प्रलंबित नाही.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सन २०१६-१७ मधील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील एकूण ३८२७ विद्यार्थ्यांना एकूण रु.१.४३ कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

(३) राज्यातील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे प्रवेश घेणाऱ्या आणि मान्यताप्राप्त बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विहित प्रवेश पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या सामाजिक मागास व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अनुदानित शाळांमधील नियमबाहयपणे मान्यता दिलेल्या शिक्षकांची मान्यता रद्द करण्याबाबत

**(१२) * ११०४५५ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानीत शाळांमध्ये नियमबाहयपणे देण्यात आलेल्या ४ हजार ११ शिक्षकांच्या मान्यता रद्द करण्यात येईल असे जाहीर करुनही त्यावर अदयाप कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नियमबाहय पध्दतीने मान्यता देवून शासनाने ९७ कोटींचे नुकसान करण्याऱ्या संस्थाचालक तसेच अधिकाऱ्यांवर अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दारिद्र्येरेषेखालील कुटुंबांना रास्तभाव दुकानातून मिळणारी साखर बंद करण्याचा घेतलेला निर्णय

**(१३) * १०८४५४ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दारिद्र्येरेषेखालील (बीपीएल) सुमारे ४५ लाख कुटुंबांना रास्तभाव दुकानातून मिळणारी साखर बंद करण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केवळ अंत्योदय योजनेतील गरिबातील गरीब कुटुंबांना साखर मिळणार असून त्याचाही दर पाच रुपयांनी वाढविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुसार राज्यातील दारिद्र्य रेषेखालील जनतेला कमी दराने साखर देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे आहे.

केंद्र शासनाने दिनांक १/६/२०१७ रोजीच्या आदेशान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार अंत्योदय योजनेतील लाभार्थ्यांना प्रती कुटुंब १ किलो या प्रमाणे साखर वाटप करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे.

राज्य शासनाने दिनांक १५.९.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये साखर विक्रीचा दर जुन, २०१७ पासून रुपये १५/- ऐवजी रुपये २० प्रती किलो करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

(३) व (४) राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना (बीपीएल) पूर्ववत साखर वितरण करण्याबाबत दिनांक ०७ /०८/ २०१७ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव केंद्र शासनाने दिनांक १७/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये नाकारला आहे.

-----------------

## मुंबईतील गोरेगाव फिल्मसिटीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१४) * १०८८६१ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगाव फिल्मसिटीमध्ये केलेल्या कामांची बोगस देयके सादर करणे, एकाच कामावर केलेल्या खर्चाचे वेगवेगळ्या संस्थांच्या नावे देयके काढून केलेला गैरव्यवहार खाजगी सुरक्षा रक्षकांची बेकायदा नियुक्ती करणे, तीन लाखांवरील कामे निविदा न काढता देणे इ.बाबत झालेल्या गैरव्यवहाराबाबत चौकशी करण्याची तक्रार सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय, चौकशी अहवाल चित्रनगरी महामंडळाकडून नुकताच प्राप्त झाला असून शासनस्तरावर छाननी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिंचपाडा (ता.पनवेल, जि.रायगड) येथे महाराष्ट्र प्राधिकरणाच्या फुटलेल्या जलवाहिनीमुळे खड्ड्यात पाणी साचून महिलेचा झालेला मृत्यू

**(१५) * १०५८६१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचपाडा (ता.पनवेल, जि.रायगड) येथे महाराष्ट्र प्राधिकरणाच्या फुटलेल्या जलवाहिनीमुळे खड्ड्यात पाणी साचून झालेल्या अपघातात वाघिवली (ता.पनवेल) येथील सुजाता पाटील वय वर्षे ३१ या महिलेचा मृत्यू झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत महिलेचे पतीही हरेश्वर पाटील हे जखमी झाले असून त्यांना कामोठे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील भोकरपाडा येथील जवाहरलाल नेहरू जलशुद्धीकरण केंद्र ते जेएनपीटी तसेच पनवेल दरम्यान ३० वर्षापूर्वी ११५ एमएलडी क्षमतेची टाकण्यात आलेली जलवाहिनी जिर्ण झाल्यामुळे जलवाहिनी फुटण्याच्या घटना वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकाऱ्यांच्या हल्लगर्जीपणामुळे वेळीच उपाययोजना केली जात नसल्यामुळे जलवाहिन्या फुटून अपघात होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दुर्लक्ष करणा-या महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच ३० वर्षापूर्वी टाकलेली जलवाहिनी बदलण्यासाठी कोणती उपायायोजना केली वा करण्यात आली आहे, तसेच मृतांच्या वारसांना शासनाने कोणती मदत केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर यांच्या अहवालानुसार सदर महिलेचा मृत्यू मृत महिलेच्या पतीच्या चुकीमुळे मोटार सायकल अपघाताने झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

दैनंदिन पाणी पुरवठा सुरळीत ठेऊन वेळेचे नियोजन करुन शटडाऊन घेऊन फुटलेल्या जलवाहिन्या दुरुस्त करण्यात येतात.

(४) हे खरे नाही.

(५) जीर्ण झालेली जूनी जलवाहिनी बदलण्याचे काम सुरु असून १०.८४० कि.मी. पैकी १.८ कि.मी. जलवाहिनी बदलण्याचे काम पूर्ण झाले आहे.

सद्य:स्थितीत करंजाडे सिडको वसाहत पनवेल महानगरपालिका वडघर टॅपिंग, वडघर गाव, गवळीपाडा, चिंचपाडा, विठ्ठलवाडी, कोली कोपर, पारगाव, दापोली, कुंडेवहाळ, खालचा ओवळा, वरचा ओवळा, पाटनोली, मोसारी इत्यादी गावांना पाणी पुरवठा जुन्या जलवाहिनीतून होत आहे.

सदर महिलेचा अपघाती मृत्यू मृत महिलेच्या पतीच्या मोटार सायकल चालविण्याच्या चुकीमुळे झाल्याने मृतांच्या वारसांना मदत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सर्व शिक्षा अभियानांतर्गत २०१८-१९ च्या वार्षिक कार्य योजना व अंदाजनिर्मितीबाबत

**(१६) * १०८९६५ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सर्व शिक्षा अभियानांतर्गत २०१८-१९ च्या वार्षिक कार्य योजना व अंदाजनिर्मिती संबंधात अ) नवीन प्राथमिक शाळा इमारत ब) अतिरिक्त वर्ग खोली बांधकाम क) संरक्षक भिंत ड) उताराचा रस्ता व स्वयंपाक गृहाची बांधकामे प्रस्तावित करण्याबाबत दिनांक २८ नोव्हेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास परिपत्रकाद्वारे सर्व जिल्हापरिषदांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार दिनांक २३ जानेवारी, २०१८ पर्यंत बांधकामाबाबतचे किती प्रस्ताव व कोणकोणत्या जिल्हा परिषदांनी शासनाला सादर केले आहेत, त्यापैकी किती प्रस्तावांना केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे, तसेच पुणे जिल्हा परिषदेचा प्रस्ताव शासनाला प्राप्त झाला आहे काय, असल्यास सदर प्रस्ताव केंव्हा प्राप्त झाला आहे,

(३) असल्यास, सदर प्रस्तावामध्ये पुणे जिल्हापरिषदेने कोणकोणत्या व एकूण किती कामांचा समावेश केला आहे  व त्यासाठी किती रक्कमेची मागणी केली आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन २०१८-१९ संदर्भात केंद्र शासनाकडून प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने सर्व जिल्हयांना बांधकामाचा प्रस्ताव सादर करणेबाबत दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(२), (३) व (४) केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व टिचर्स एज्युकेशन या तिन्ही केंद्र पुरस्कृत योजना एकत्रित राबविण्यात येणार असल्याबाबत कळविले आहे. तथापि केंद्र शासनाकडून मार्गदर्शक सूचना अप्राप्त आहेत. सदर मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार जिल्हयांकडून प्रस्ताव मागवून केंद्र शासनाकडे मंजूरीस्तव पाठविण्याची तजवीज ठेवली आहे.

-----------------

## हुपरी (जि.कोल्हापूर) ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रुपांतर झाल्यानंतर पेयजल योजनेचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(१७) * ११०६९५ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हुपरी (जि.कोल्हापूर) ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रुपांतर झाल्यानंतर पूर्वी सुरु असलेली राष्ट्रीय पेयजल योजना कोणाकडे वर्ग करावी, या संभ्रमामुळे रुपये १ कोटी ४३ लाख निधी अखर्चित राहिला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, अंशत: खरे आहे.

पाणी व स्वच्छता समिती, हुपरी यांचेकडील बँक खाती अंदाजित रु. ९१.८० लक्ष इतकी रक्कम शिल्लक असून उर्वरीत रु. २५.०० लक्ष इतका निधी पाणी व स्वच्छता समिती,हुपरी यांचेकडे अद्याप वर्ग केलेला नाही.

(२) शासन शुध्दीपत्रक क्रमांक:ग्रापाधो-१११९/प्र.क्र.१७४/पापु-७,दिनांक २.१२.२०११ मधील तरतुदी विचारात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,कोल्हापूर हे तांत्रिक पर्यवेक्षण PMC म्हणून काम करीत असल्याने ही व्यवस्था कायम ठेवून सदर योजनेच्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्याचे काम करण्यास जिल्हा परिषद,कोल्हापूर यांना शासन पत्र क्रमांक:पापुयो-२४१७/प्र.क्र.६०/पापु-१७,दिनांक १३ जुलै,२०१७ अन्वये परवानगी देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पाणीपुरवठा योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(१८) * १०५९४७ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.मनोहर भोईर**

**(उरण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागाच्या पाणीपुरवठा योजनांसाठी शासनाने ७०० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेतला असून सदर निधीपैकी केवळ २१० कोटी रुपयांचा निधी प्रत्यक्षात देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील ग्रामीण जनतेस पुरेसे आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करण्याकरिता राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेतून राज्यात सुमारे २ हजार ५०० कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास,केज, अंबाजोगाई, बीड (जि.बीड) तालुक्यातील ८ गावांमध्ये या मंजूर झालेल्या योजनेंतर्गत कामे सुरु झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, हिंगणघाट (जि.वर्धा) येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांच्या मतदार संघातील गावांचा पाणीपुरवठा योजनेत समावेश करून निधी उपलब्ध करून देण्याबाबत मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांना माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार सदर योजना राज्यात प्रभावीपणे राबविण्याकरीता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अनुक्रमे रु. ३६० व २७० कोटी असा एकूण रु. ६३० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

विभागाच्या दिनांक ०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीत मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत १००३ नवीन पाणी पुरवठा योजनांकरिता रु. २००० कोटी, बंद असलेल्या ८३ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या पुर्नरुज्जीवनाकरिता रु. १३०.८६ कोटी व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीकरिता रु. ४०० कोटी याप्रमाणे एकूण रुपये २५३०.८६ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सद्य:स्थितीत सदर कार्यक्रमांतर्गत नव्याने घ्यावयाच्या १००३ योजनांपैकी रु.११७७.५३ कोटी इतक्या किंमतीच्या ५२३ नळ पाणी पुरवठा योजनांना मंजूरी देण्यात आली आहे. तसेच बंद असलेल्या रु.२४.७३ कोटी इतक्या किंमतीच्या १८ प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पुर्नरुज्जीवीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

(४) अंशत: खरे आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बीड जिल्ह्यातील रु.११०५.९९ लक्ष इतक्या किंमतीच्या १५ पाणी पुरवठा योजनांना मंजूरी देण्यात आली असून, त्यामध्ये केज, अंबाजोगाई, बीड तालुक्यातील ०६ योजनांचा समावेश आहे. सदर सर्व योजनांच्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

(५) होय.

याबाबत सदर गावांचा समावेश टप्पा-२ मध्ये करण्याकरीता पूर्वव्यवहार्यता अहवाल शासनाच्या दिनांक २९/०१/२०१८ च्या पत्रान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून मागविण्यात आला आहे.

(६) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत रु. ११७७.५३ कोटी इतक्या किंमतीच्या ५२३ पाणी पुरवठा योजनांना शासन स्तरावरील अपर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत मंजूरी देण्यात आली असून,

उर्वरित पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी तातडीने होणेकरिता रु. २.०० कोटीपर्यंत किंमतीच्या पाणी पुरवठा योजनांच्या तांत्रिक तपासणीचे अधिकार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखालील समितीस प्रदान करण्यात आले आहे. तसेच मंजूरी देण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनांची कामे तातडीने सुरु करणेबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## सिडको नविन नांदेड (जि.नांदेड) भागातील तालुका क्रीडा संकुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१९) * ११०२२९ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको नविन नांदेड (जि.नांदेड) भागातील कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधण्यात येत असलेल्या तालुका क्रीडा संकुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तालुका क्रीडा संकुलाचे काम गत पाच वर्षापासून सुरु असूनही अद्यापी पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, तालुका क्रीडा संकुलाचे काम त्वरित पूर्ण करावे अन्यथा दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा क्रीडाप्रेमी नागरिकांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) तालुका क्रीडा संकुल, सिडको-नांदेड साठी शासन निर्णयानुसार देय अनुदान रु.१००.०० लक्ष वितरीत करण्यात आले असून सदर निधीतून बहुउद्देशिय हॉल, वुडन फ्लोअरिंग, विद्युत कामे व क्रीडा साहित्य इ. क्रीडा

सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. तसेच जिल्हा नियोजन समिती, नांदेडमार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंतर्गत रस्ते, संरक्षण भिंत इ.कामे करण्यात आली आहेत. उर्वरित २०० मी. धावनपथ व विविध खेळाची मैदाने इ. कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने रु.७७.०० लक्ष निधीची मागणी केलेली असून निधी अभावी सदरील कामे अपूर्ण आहेत.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

याबाबत दिनांक ०९.०२.२०१८ रोजी मा.आमदार तथा अध्यक्ष, तालुका क्रीडा संकुल समिती यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक नागरिक व लोकप्रतिनीधीं यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत मा.आमदार तथा अध्यक्ष यांनी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनीधीं यांच्या समस्या ऐकूण घेवून त्या सोडविण्याचे आश्वासन दिले व संबंधित उपोषण कर्त्यांना उपोषणापासून परावर्तीत व्हावे असे आवाहन केले. तसेच तालुका क्रीडा संकुल समितीच्या खात्यातील शिल्लक निधीमधून २०० मी. धावनपथाचे काम पूर्ण करण्याचे आदेशित केले. त्यानुसार धावनपथाचे काम पूर्ण करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय अनुदानित आश्रमशाळांना विभागाकडून होणारा रेशनिंग धान्यपुरवठा बंद करण्यात आल्याबाबत

**(२०) * १०७७५२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव**

**रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय अनुदानित आश्रमशाळांना अन्न व नागरीपुरवठा विभागाकडून होणारा रेशनिंग धान्यपुरवठा बंद करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शाळा व्यवस्थापनाला बाजारातील अधिक दराने विक्री होणारे धान्य विकत घ्यावे लागत असल्याने शासकीय अनुदानित आश्रमशाळांना आर्थिक भार सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आदिवासी विकास विभागाकडून मिळणाऱ्या तुटपुंज्या अनुदानातून निवासी विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास, आरोग्य व इतर सुविधा वाढत्या महागाईमुळे पुरविणे शक्य होत नसताना, रेशनिंगचा मिळणारा धान्य पुरवठा देखील बंद झाल्याने आश्रमशाळा व्यवस्थापन अडचणीत आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३), (४) व (५) कल्याणकारी संस्था व वसतीगृह यांच्याकरिता माहे एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीसाठी द्यावयाचे अन्नधान्य केंद्र शासनाकडून अद्याप प्राप्त झालेले नाही.

केंद्र शासनाकडून उपरोक्त कालावधीतील धान्याचे नियतन प्राप्त न झाल्यामुळे राज्यातील कल्याणकारी संस्थांमधील लाभार्थी धान्या अभावी वंचित राहू नये, यासाठी ज्या जिल्ह्यांकडे सदर योजनेतील धान्य शिल्लक आहे, त्या जिल्ह्यांनी सदर शिल्लक धान्यातून सर्व संस्थांना तात्काळ

धान्याचे वितरण करावे व ज्या जिल्ह्यांकडे वरीलप्रमाणे धान्य शिल्लक नाही, त्या जिल्ह्यांनी इतर योजनेतील धान्य कल्याणकारी योजनेअंतर्गत धान्य वितरणासाठी वर्ग करून वाटप करण्यात यावे, असे दि.२.०८.२०१७ व दि.२१.११.२०१७ च्या शासन पत्रान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे. केंद्र शासनास उपरोक्त कालावधीतील अन्नधान्याचे नियतन देण्यासाठी वेळोवेळी मागणी करण्यात आली आहे.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील कोलसेल खाडी किनारी असलेल्या तिवरांची तोड केल्याबाबत

**(२१) * १०७७२८ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कोलसेल खाडी किनारी असलेल्या तिवरांची भूमाफीयांकडून मोठ्या प्रमाणात तोड करण्यात येऊन तेथे अनधिकृतरित्या चाळी बांधण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार कोलसेल खाडी किनाऱ्यावरील तिवरांची बेकायदा तोड करून अनधिकृत चाळी उभारणाऱ्या भूमाफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी श्रीमती उषा चरणजीत रॉय व इतर यांचेविरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम १५ व १९ अन्वये कापुरबावडी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र.३०४८/२०१७ अन्वये दिनांक २०.१२.२०१७ रोजी नोंदविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुंभारमाठ (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) गावातील शासकीय तंत्रनिकेतनच्या वसतिगृहामध्ये नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२२) * १०५६९५ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभारमाठ (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) गावातील शासकीय तंत्रनिकेतनच्या वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना प्रतिदिन ८०,००० लीटर पाण्याची आवश्यकता असताना मालवण नगरपंचायतीमार्फत आठवड्यातून एकदा ५० ते ६० हजार लीटर पाणी उपलब्ध करून दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे वसतिगृहातील विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचाऱ्यांना अडचणी येत असल्यामुळे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास मालवण नगरपरिषदेने तात्पुरती पाण्याची व्यवस्था केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नंतर उक्त पाणी पुरवठा कायमस्वरूपी बंद करण्यात येणार असल्याचे पत्र शासकीय तंत्रनिकेतन व वसतिगृह व्यवस्थापनाला मालवण नगरपरिषदेने दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर योजना नव्याने व वाढीव क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठीचा प्रकल्प अहवाल तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे, शासकिय तंत्रनिकेतन वसतीगृहास आठवडयातून किमान ४ दिवस सरासरी २० ते ४० हजार लीटर पाणी पुरवण्यात येत आहे.

(२) होय. हे खरे आहे.

शासकीय तंत्रनिकेतन येथील भुमीगत पाणी साठवण टाकीमध्ये मोठया प्रमाणात गळती होते. त्यामुळे टाकीत पाणीसाठा शिल्लक रहात नाही. दि.२६.१.१८ पासून पाणीपुरवठयाची मुख्य पाईपलाईन मोठया प्रमाणात

फुटलेली असल्याने, दुरुस्तीसाठी मालवण शहरासह कुंभारमाठ ग्रामपंचायत व शासकीय तंत्रनिकेतन यांचा पाणीपुरवठा कमी किंवा बंद ठेवणे भाग पडले होते. तथापि, शासकिय तंत्रनिकेतन येथे नगरपरिषदेच्या अग्निशमन टँकरद्वारे अत्यावश्यक वापरासाठी पाणीपुरवठा करण्यात आला होता.

(३) हे खरे नाही, मालवण नगरपरिषदेची सदर पाणीपुरवठा योजना कालबाहय होत आलेली असल्याने पाईप जीर्ण झालेले आहेत, तांत्रिक कारणांमुळे पाईपलाईन फुटण्याचे प्रमाण वाढलेले आहे, पंप व विद्युत मीटर वारंवार बिघडत आहेत. त्यामुळे पंपिंग मशीनवरील अतिरिक्त भार कमी करण्यासाठी दि.३०.१२.१७ रोजीच्या पत्रान्वये शासकीय तंत्रनिकेतन परिसरातील बंद पडलेल्या विंधन विहीरी व मुख्य विहीरीची दुरुस्ती करुन घेण्याबाबत शासकिय तंत्रनिकेतन यांना नगरपरिषदेने कळविले आहे.

(४), (५) व (६) नगरपरिषदेची पाणीपुरवठा योजना कालबाहय होत आल्याने व देखभाल/दुरुस्तीसाठी मोठया प्रमाणात खर्च होत असल्याने, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेतून सदर योजना नव्याने व वाढीव क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठीचा प्रकल्प अहवाल तांत्रिक मान्यतेसाठी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर अहवालात शासकिय तंत्रनिकेतनच्या मागणीचा समावेश करण्यात आलेला आहे. नविन योजनेसंदर्भात तांत्रिक बाबींची पूर्तता झाल्यावर, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान, नगर विकास विभागाशी संबंधित असल्याने, पुढील कार्यवाही नगर विकास विभागाकडून अपेक्षित आहे.

-----------------

## कोरेगाव (जि.सातारा) तालुक्यातील कोयना, धोम, कण्हेर या गावामधील जुन्या पाणीपुरवठा करणाऱ्या टाक्यांची दुरुस्ती करणेबाबत

**(२३) * १०७०२४ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगाव (जि.सातारा) तालुक्यातील कोयना, धोम, कण्हेर या प्रकल्पग्रस्त गावामधील जुन्या पाणीपुरवठा योजना हया ४० वर्षापूर्वीच्या असून त्याकरिता बांधण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्या सदयस्थितीत  निकामी व धोकादायक स्थितीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाण्याच्या टाक्या निकामी व धोकादायक झाल्याने अनेक ठिकाणी पाण्याची गळती होऊन पाण्याचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तसेच स्थानिक कार्यालयात वारंवार लेखी निवेदन देऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,  त्यानुसार उपरोक्त योजनांकरिता तातडीने निधी देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

काही जुन्या टाक्यां निकामी व धोकादायक झालेल्या नसून पाणी पुरवठा सुरु आहे. सदर टाक्यांमध्ये किरकोळ लिकेजमुळे त्यामधुन पाण्याची किरकोळ  गळती होत आहे.

(३) व (४) सदर नळपाणी पुरवठा योजनेतील टाक्यांची किरकोळ दुरुस्तीची कामे १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतींना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नांदेड, चंद्रपूर, बीड, यवतमाळ, वाशिम जिल्हयात फ्लोराईड मिश्रीत पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(२४) * १०६१३३ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.रामचंद्र**

**अवसरे (भंडारा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय हरित लवादाने (एन.जी.टी.) राज्यातील नांदेड, चंद्रपूर, बीड, यवतमाळ, लातूर, वाशिम इ.१२ जिल्हाधिकाऱ्यांना अटक करुन हजर करा असे लेखी आदेश देऊन या सर्वांचे जामीनपात्र वॉरंट संबंधीत जिल्हा पोलीस अधीक्षकांना पाठविल्याची बाब दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व जिल्हयातील फ्लोराइड मिश्रित पाण्यामुळे होणाऱ्या फ्लोरोसीस आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करण्याबाबत हरित लवादाने वेळोवेळी कळवूनसुध्दा जिल्हाधिकारी यांनी गेली तीन वर्षे या प्रकरणी दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तीन वर्षानंतर हरित लवादाने संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या कारवाईबद्दल अहवाल मागितला असता, ज्या जिल्हाधिकाऱ्यांनी लवादाला कोणतीच माहिती दिली नाही अशा बेजबाबदार जिल्हाधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, या १२ जिल्हयातील फ्लोराइड मिश्रित पाण्याचे स्त्रोत कायमचे नष्ट करण्याकरीता कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, मा.राष्ट्रीय हरित लवादांनी (एन.जी.टी) दि.२८/११/२०१७ रोजी राज्यातील नांदेड, चंद्रपुर, बीड, यवतमाळ, लातुर, वाशिम, परभणी, हिंगोली, जालना, जळगाव, नागपुर, भंडारा, इ. १२ जिल्हाधिकाऱ्यांचे जामीनपात्र वॉरंट संबंधीत जिल्हा पोलीस अधीक्षकांना पाठविले होते. तसेच सदर १२ जिल्हाधिकाऱ्यांचे जामीनपात्र वॉरंट मा.राष्ट्रीय हरित लवादाने रद्द केलेले आहे.

(२) व (३) श्री.असिम सरोदे व इतर यांनी मा. राष्ट्रीय हरित लवाद यांच्याकडे दाखल केलेल्या अर्ज क्र.४७/२०१३ मध्ये सदर १२ जिल्हाधिकाऱ्यांना प्रतिवादी करण्यात आले होते. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील प्लोराईड मिश्रित पाण्याच्या वापरावर प्रतिबंध करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांबाबत मा.राष्ट्रीय हरित लवादासमोर प्रतिज्ञापत्र सादर केले होते. त्यानुषंगाने मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी दिनांक ११/०१/२०१६ रोजी अंतिम आदेश पारित केले आहेत.

(४) व (५) मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांनी दिनांक ११/०१/२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे. त्यामध्ये मुख्यत्वे प्लोराईड मिश्रीत पाण्याचे स्त्रोत निश्चित करुन ते बंद करणे तसेच मिश्रीत पाण्यामुळे बाधित रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे इ. उपाययोजनांचा समावेश आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोटे (ता. खेड, जि. रत्नागिरी) औदयोगिक क्षेत्रातील चेंबर ओव्हरफ्लो होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(२५) * १०७५९७ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औदयोगिक क्षेत्रातील सीईटीपीलगतचा चेंबर ओव्हरफ्लो होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चेंबर ओव्हरफ्लो होवून रासायनिक सांडपाण्याची गळती होवून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची बाब स्थानिक ग्रामस्थांनी सीईटीपी तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली असून देखील अदयाप कोणतीही कारवाई केलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सदरहू ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करुन रासायनिक सांडपाण्याची गळती थांबवण्याबाबतच्या सूचना दिल्या. तसेच सदर प्रकारची पुनरावृत्ती होवू नये. याबाबतीत दक्षता घेण्याच्या सूचना देखील सीईटीपी प्रशासन तसेच महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळास देण्यात आलेल्या आहेत. एमआयडीसी लोटे मधील जुन्या पाईपलाईनचे पुर्नविलोकन करुन जुनी पाईपलाईन बदलण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंदकेसरी मल्लांना प्रतिमहिना १० हजार रुपयांचे मानधन सुरु करण्याबाबत

**(२६) * १११६८६ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने हिंदकेसरी मल्लांना वृद्धापकाळात आधार मिळावा याकरिता प्रतिमहिना १० हजार रुपयांचे मानधन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ६ वर्षांपासून कोल्हापूर, सांगली, सोलापूर, पुणे या जिल्हयातील मल्लांना मानधन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या वयोवृध्द खेळाडूंना दिनांक २१ डिसेंबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार सुधारित दराने मानधन अदा करण्यात येते, त्यानुसार हिंदकेसरी विजेत्या मल्लास रु.६०००/- प्रतिमहा इतकी रक्कम मानधन म्हणून अदा करण्यात येते.

(२) व (३) माहे जुलै, २०१७ अखेरपर्यंत सर्व लाभार्थी वयोवृध्द खेळाडूंचे मानधन त्यांच्या बँक खात्यात RTGS प्रणालीद्वारे अदा करण्याबाबत संबंधित जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. तसेच लाभार्थ्यांचे मार्च २०१८ पर्यंतचे मानधन अदा करण्यासाठी लागणारा निधी पुरवणी मागणीद्वारे मंजूर झाला असून तो वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुण्यातील विविध भागातील कंपन्या मैलामिश्रीत पाणी प्रकिया न करता मुळा-मुठा नदीत सोडत असल्याने नदीचे होणारे प्रदूषण

**(२७) * १०५१९७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेसह वारजे, वडगाव-धायरी, बावधन, कात्रज भागातील कंपन्या मैलामिश्रीत पाणी प्रकिया न करता मुळा-मुठा नदीत सोडत असल्याने शेतात पाणी धरताना या पाण्याचा फेस तयार होऊन शेतीसह नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण झाला असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुण्यातील प्रदूषणात लक्षणीय वाढ झाल्याची बाब "सफर" या संस्थेच्या सर्वेक्षणामध्येही निदर्शनास आली तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात पुण्यातील मुळा नदीच्या पाण्याची गुणवत्ता जानेवारी ते जून या कालावधीत वाईट ते अतिवाईट प्रकारात मोडत असून सप्टेंबर मध्ये ती वाईट स्वरुपाची असल्याची नोंद झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेड सिटी मधून मुठा नदी पात्रात घन कचरा, प्लास्टिक व इतर पदार्थ टाकण्याच्या तसेच प्लास्टिकचे पदार्थ किनाऱ्यावर जाळण्याच्या वाढत्या प्रकारांमुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच हवेली तालुक्यातील अनेक गावांच्या नदीकाठच्या भागात ऊसशेती मोठ्या प्रमाणात असून रसायनमिश्रित पाण्यामुळे नदी दुषित होऊन नदीत जलपर्णींची वाढही झपाट्याने होत असुन त्यामुळे नागरिकांचे व शेतकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही. तथापि, नागरी सांडपाणी व आकस्मितरित्या जाणारे मैलामिश्रीत सांडपाणी यामुळे मुळा-मुठा नदीचे प्रदूषण होत आहे.

(२) हे खरे आहे. "सफर" या संस्थेच्या संकेतस्थळावरील माहितीनुसार पुणे शहरामध्ये हवेची गुणवत्ता खालावलेली असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पुण्यातील मुळा नदीच्या पाण्याची गुणवत्ता नियमित तपासली जाते. अहवालावरुन नदीच्या पाण्यात नागरी वस्तीतील घरगुती सांडपाणी मिसळल्यामुळे टोटल व फिकल कोलीफॉर्म या घटकांचे प्रमाण मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) हवेली तालुक्यातील मुळा मुठा नदीकाठच्या गावांमध्ये ऊसशेती आहे हे खरे आहे. तथापि, मुळा-मुठा नदीच्या दूषित पाण्यामुळे जलजन्य साथीच्या आजाराचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत नाही. तसेच नदीपात्रामध्ये वाढलेली जलपर्णी बाहेर काढून शास्त्रोक्त पध्दतीने त्याची विल्हेवाट लावण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जलसंपदा विभाग व स्थानिक स्वराज्य संस्था यांना कळविण्यात आले आहे.

(५) पुणे महानगरपालिकेकडून घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया मुळा-मुठा नदीत सोडले जात असल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुणे महानगरपालिकेविरुध्द मा.मुख्य न्याय दंडाधिकारी, पुणे यांच्या न्यायालयात फौजदारी खटला क्र. ९५७/२०१६ दाखल करण्यात आला आहे.

-----------------

## धुळे जिल्हयात शालेय पोषण आहारामध्ये होत असलेला गैरव्यवहार

**(२८) * १०६५८१ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात शिक्षण संचालक श्री.सुनील चव्हाण यांच्या संगनमताने शालेय पोषण आहारामध्ये गैरव्यवहार होत असल्यामुळे याप्रकरणी जबाबदार व्यक्तींविरोधात कारवाई करण्याकरिता मुलायमसिंग गोरखशर्मा तसेच अन्य पदाधिकाऱ्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी श्री.अरविंद अंतुर्लीकर, (जि.धुळे) यांच्याकडे निवेदनाद्वारे दिनांक ९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास तक्रारीद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ठेकेदारांनी शासनास कळविलेले वस्तूंचे भाव हे जास्त असल्याबाबत तपासात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदाराला जास्त प्रमाणात दर मंजूर करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाली आहे.
(२), (३) व (४) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी जिल्हानिहाय ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रिया दि.०१/१२/२०१६ च्या खरेदी धोरणातील तरतूदीनुसार राबविण्यात आली असून निविदा प्रक्रियेद्वारे आलेले दर व जिल्हयांकडून प्राप्त बाजारातील दर विचारात घेवून दर अंतिम करण्यात आले आहेत. निविदेमधून आलेले दर हे केंद्र शासनाने शालेय पोषण आहार योजनेसाठी ठरवून दिलेल्या प्रति विद्यार्थी आहार खर्च मर्यादत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक व औरंगाबाद शहरातील पेट्रोलपंपावर ग्राहकांना पाणी मिश्रीत पेट्रोल दिले जात असल्याबाबत

**(२९) * १०८९०० श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरामध्ये पेट्रोलपंपावर पाणी मिश्रीत पेट्रोलची विक्री केली जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी मिश्रीत पेट्रोल मुळे नागरिकांच्या वाहनाचे नुकसान होत असल्यामुळे याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास प्रत्यक्ष भेटून

जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे केलेली आहे तसेच पेट्रोलमधील इथेनॉलची तपासणी करुन १५ दिवसात अहवाल सादर करण्याच्या आदेशाकडे दुर्लक्ष करणाऱ्या भारत पेट्रोलियम कंपन्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्याचा आदेश नाशिक जिल्हाधिकारी यांनी पुरवठा विभागाला दिला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील बिडकीन परिसरात पेट्रोल पंपांवर पाणीमिश्रित पेट्रोलची विक्री होत असून ग्राहकांची आर्थिक लूट होत असल्याने या प्रकरणी ग्राहकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पेट्रोलियम विभागाच्या नियमानुसार पेट्रोलपंपावर ग्राहकांसाठी लिटमस पेपर, सुचना बोर्ड, शिल्लक साठा, भावफलक, प्रसाधनगृह, पिण्याचे पाणी, फ्रि एअर चेकींग या सुविधा बंधनकारक असतांना देखील पेट्रोलपंपधारकांकडून ग्राहकांना पुरविल्या जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास नाशिकमध्ये काही पंपांची तपासणी केली असता १ लिटर पेट्रोलच्या बाटलीत ३०० मिली पाणी आढळून आल्याने शहरातील पेट्रोलपंप तपासणी पुरवठा विभागाकडून होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) बेले पेट्रोल पंप, द्वारका, नाशिक व अष्टविनायक पेट्रोलपंप, मौजे गिरनारे, ता.नाशिक यांच्याविरूद्ध तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्याअनुषंगाने नाशिक जिल्हयातील पेट्रोल, डिझेल पंपांची तपासणी करुन अहवाल सादर करणेबाबत तेल कंपन्यांचे संबंधित विक्री अधिकारी यांना कळविण्यात आले. त्यांनी ६५ पेट्रोल पंपांच्या केलेल्या तपासण्यांमध्ये पेट्रोलमध्ये पाणीमिश्रीत असल्याचे दिसून आले नाही.

(३) व (४) जानेवारी, २०१८ मध्ये पैठण तालुक्यातील बिडकीन परिसरातील पेट्रोल पंपावर पाणीमिश्रीत पेट्रोलची विक्री होत असल्याची तक्रार जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे प्राप्त झालेली नाही.

(५) नाशिक शहरात पेट्रोल, डिझेल पंपांच्या करण्यात आलेल्या तपासण्यांमध्ये अशी बाब आढळून आली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांना ऑनलाईन वेतन वितरीत करण्यासाठी शालार्थ आय.डी नुसार ऑनलाईन मंजूरी देण्याबाबत

**(३०) * १०९१४४ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांच्या नियुक्तीवर दिनांक २ मे, २०१२ नंतर निर्बंध घालण्यात आले असूनही अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन झाल्याशिवाय शिक्षक भरती करण्यात आली, मात्र दिनांक २ मे,२०१२ पूर्वीचे व त्यानंतर विज्ञान, गणित विषयाच्या शिक्षकांना व अल्पभाषिक, अल्पधार्मिक शाळांची पदे भरण्याची मंजूरी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षणाधिकारी यांनी मंजूरी दिलेल्या शिक्षकांना ऑनलाईन वेतन वितरीत करण्यासाठी शालार्थ आय.डी नुसार ऑनलाईन मंजूरी आवश्यक असून राज्यातील जवळपास १७०० प्रस्ताव शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, वर्धा जिल्हयातील शिक्षक संघटना व स्थानिक लोकप्रतिनिधी (हिंगणघाट) यांच्या उपस्थितीत माहे जानेवारी, २०१८ मध्ये सचिव, शालेय शिक्षण यांच्या स्तरावर सर्व संबंधीतांना आमंत्रित करून बैठक घेऊन संबंधीत

शिक्षक कर्मचा-यांना शालार्थ प्रणालीत समावेश करण्यासाठीची कार्यवाही करण्याबाबत सचिव, शालेय शिक्षण यांनी आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार प्रलंबित प्रस्तावाना त्वरीत मंजूरी देण्याबाबत व शालार्थ आय.डी लॉगीनचा अधिकार मुख्याधपक/प्राचार्य यांना देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

शिक्षण संचालक, प्राथमिक यांच्याकडे एकूण २५८ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी २९ प्रस्ताव त्यांचेकडे प्रलंबित आहे.

तसेच शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांच्याकडे एकुण १५८४ प्रस्ताव प्राप्त असून ५९१ प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

सदर बैठकीत ८ शिक्षकांचा शालार्थ प्रणालीत समावेश करण्याबाबत आदेश देण्यात आले होते.

त्यानुसार या शिक्षकांचा शालार्थ प्रणालीत समावेश केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दहावी व बारावीच्या परिक्षा मंडळाबरोबर “आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ” स्थापन करण्याचा घेतलेला निर्णय

**(३१) * १०४८०३ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अमित साटम (अंधेरी**

**पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दहावी व बारावीच्या परिक्षा मंडळाबरोबर “आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ” स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाशी परराज्यातील आणि परदेशातील शाळांनाही संलग्नता देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील १०० निवडक शाळांना आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याची विशेष मोहीम हाती घेतली त्या शाळाही या मंडळाशी संलग्न असणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मंडळाचे आणि दहावी व बारावीच्या परिक्षा घेणा-या राज्य शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमांमध्यें कोणते बदल करण्यात येणार आहेत, त्याचे थोडक्यात स्वरुप व कार्यकक्षा काय आहेत, सदर आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ कोणत्या शैक्षणिक वर्षापासून कार्यरत करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली तसेच कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) होय.

(४) व (५) राज्यात आंतरराष्ट्रीय शैक्षणिक दर्जाच्या शाळा निर्माण करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ अन्वये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा निर्मितीचे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये होणारे अध्ययन-अध्यापन आंतरराष्ट्रीय मानकांप्रमाणे असणे आवश्यक असून, याकरिता शैक्षणिक दृष्ट्या पुरेसे स्वातंत्र्य व स्वायतत्ता मिळणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात या शाळांच्या .संलग्नतेकरिता महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शाळा मंडळ असे नवीन बोर्ड स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २ जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. या महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शाळा मंडळांतर्गत विविध समित्या स्थापन करण्यात येणार असून त्यामध्ये अभ्यासक्रम समिती स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना स्कॉलरशिप मिळण्यासाठीचा विकल्प एमएचएडीबीटी या पोर्टलवर उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३२) * ११०४१९ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिक्षणाच्या सर्व स्थरावर (इ. १ ली ते पदव्युत्तर स्तर) नि:शुल्क शिक्षण देण्याबाबत शासनाने शासन निर्णय व परिपत्रक काढले असतांनाही शासनाच्या एमएचएडीबीटी या शैक्षणिक स्कॉलरशिप पोर्टलवर शिक्षकांच्या पाल्यासाठी स्कॉलरशिप प्रकाराचा विकल्पच नसल्याने शिक्षकांच्या पाल्यांना स्कॉलरशिप मिळण्यासाठी अर्ज करता येत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शिक्षकांच्या पाल्यासाठी असलेल्या स्कॉलरशिप प्रकाराचा विकल्प एमएचएडीबीटी या पोर्टलवर उपलब्ध करुन देण्याकरता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. शासनाच्या एमएचएडीबीटी या पोर्टलवर शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ५ योजनांचा समावेश करण्यात आला आहे. त्या योजनांमध्ये राज्यातील  अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिक्षणाच्या सर्व स्थरावर (इ.१ ली ते पदव्युत्तर स्तर) नि:शुल्क शिक्षण या योजनेचा समावेश नाही. ही योजना पूर्वीप्रमाणेच राबविण्यात येत आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## भंडारा व पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील ए.पी.एल. कार्डधारक ग्राहकांना पूर्ववत धान्य पुरवठा करण्याबाबत

**(३३) * १०९१९०  श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील ए.पी.एल. कार्डधारक ग्राहकांना सन २०१३ सालापासून धान्य पुरवठा बंद असल्याने सदर ग्राहकांना सार्वजनिक वितरण प्रणाली योजनेअंतर्गत अन्न धान्य पुरवठा करण्याच्या अनुषंगाने स्वतंत्र पात्र यादी तयार करून धान्य पुरवठा करण्याबाबतचे निवेदन  मा.अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांना दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या दरम्यान देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सन २०१३ वर्षापासून ए.पी.एल. कार्डधारकांना धान्य पुरवठा करण्याच्या अनुषंगाने योग्य ती चौकशी करून तसेच पात्र यादी तयार करण्याच्या अनुषंगाने शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषगांने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) व (३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत शहरी भागातील रु.५९,०००/- व ग्रामीण भागातील रु.४४,०००/- कमाल वार्षिक उत्पन्न असलेल्या

लाभार्थ्यांचा पात्र लाभार्थी म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. राज्यामध्ये सध्या शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम सुरु असून, सदर काम बहुतांश पूर्ण झालेले आहे. शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचा निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर अपात्र शिधापत्रिकाधारकांची लाभार्थी म्हणून नोंद होणार नसल्याने ते आपोआप रद्द होतील आणि त्यामुळे प्राप्त झालेल्या इष्टांकानुसार नवीन पात्र लाभार्थ्यांचा योजनेत समावेश करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रेवसा (जि.अमरावती) गावाला पाणीपुरठा करणारी टाकी नादुरुस्त असल्याबाबत

**(३४) * १०७००१ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवसा (जि.अमरावती) गावातील लगाव मार्गावर जाणा-या रस्त्याच्या लगत असलेल्या अत्यंत जुन्या पाण्याच्या टाकीचे चारही खांब कमकुवत झाल्याने ठिकठिकाणी भेगा पडून सिमेंटचा भाग खाली पडत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पाण्याच्या टाकीखाली पाणीपुरवठा कर्मचारी राहत असून टाकीलगतच प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी केंद्र तसेच जिल्हापरिषदेची शाळा असून सदर जीर्ण झालेली पाण्याची टाकी कोसळण्याची शक्यता असूनही त्याकडे ग्रामपंचायतीचे व संबंधित पाणीपुरवठा विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार पाण्याच्या टाकीची दुरुस्ती किंवा सदर पाण्याची टाकी पाडून नवीन बांधण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

ग्रामपंचायतीच्या ताब्यातील जुनी टाकी जीर्ण झाली असून, सदर टाकीची दुरुस्ती करणे शक्य नसल्यामुळे, नविन टाकीचे बांधकाम व पाइप लाईन टाकण्याकरीता मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम टप्पा-२ मध्ये प्रस्तावित करण्यात आली आहे.

तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या निरीक्षण पथकाने सदर पाण्याच्या टाकीची तपासणी करुन ३० टक्के कमी पाणी भरण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, नविन टाकीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत जुनी टाकी ३० टक्के कमी भरुन वापरण्याच्या सूचना गामपंचायतीला देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) एमआयडीसीतील रंगद्रव्य तयार करणाऱ्या कंपनीतील धूळ पसरुन होणारे प्रदूषण

**(३५) * १०७०७७ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर),**

**श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील महाड एमआयडीसीतील रंगद्रव्य तयार करणाऱ्या कंपनीतील रंगीत धूळ शेजारच्या जिते गावात पसरत असल्यामुळे सदर गावातील नागरिकांच्या हातापायांचा रंग सदर रासायनिक धुळीमुळे बदलत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील वाहने, घरांच्या भिंती, खिडक्या या निळया झाल्या असून हिरवी धूळ पसरुन ती अन्न व श्वसनावाटे नागरिकांच्या शरीरात गेल्याने अंगाला खाज सुटणे, डोळे चुरचुरणे, श्वास घेण्यास त्रास होणे अशा प्रकारचा त्रास जाणवू लागल्यामुळे गावातील दोघांना एमएमए रुग्णालयात दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांनी सदर प्रकाराची माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले आहे त्या अनुषंगाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१), (२) व (३) मे.मल्लक स्पेशालिटी प्रा.लि. या कारखान्यामधून निळ्या रंगाचे धूलीकण बाहेर पडत असून यामुळे जिते गावातील नागरिकांना श्वसनाचा त्रास होत असल्याबाबतची तक्रार एमआयडीसी पोलीस स्थानक, महाड यांच्याकडून दुरध्वनीद्वारे उपप्रादेशिक कार्यालय, महाड यांच्याकडे प्राप्त झाली, हे खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, बिरवाडी यांच्या आरोग्य पथकाकडून दिनांक ६.१.२०१८ रोजी जिते ग्रामस्थांच्या आरोग्य सर्वेक्षणाचेवेळी १) महंमद बाबा दरेखान २) नजमा महंमद दरेखान या दोन ग्रामस्थांना चक्कर व उलटीचा

त्रास होत असल्याचे आढळून आल्यामुळे त्यांचेवर उपचार करुन ग्रामिण रुग्णालय , महाड यांचेकडे संदर्भ सेवा देण्यात आली आहे.

(४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मे.मल्लक स्पेशालिटी प्रा.लि. या कारखान्यांस स्वत: उत्पादन बंद करण्याचे (Voluntary Closure) चे निर्देश बजाविण्यात आले होते. तथापि सदर उद्योगाने निर्देशांचे पालन न केल्याने पुन्हा उत्पादन बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत बजावण्यात आले होते. त्यानुसार सदर उदयोगाने त्यांची उत्पादन प्रक्रिया दि.१९/०२/२०१८ रोजी सायंकाळी ४ वाजेपासुन ते २२/०२/२०१८ रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत बंद ठेवली होती.

दरम्यान सदर उदयोगाने इथीलीन ऑक्साइड प्लान्टला सतत थंड (चीलींग) स्थितीत ठेवावे लागत असल्यामुळे पाणीपुरवठा पुन्हा सुरु करण्यात यावा, अन्यथा स्फोट होऊन मोठी दुर्घटना होऊ शकते. तसेच उदयोगाने हवा प्रदुषण नियंत्रण सयंत्रणेत आवश्यक ती सुधारणा केली असल्याने उत्पादन पुन्हा सुरू करण्याची विनंती दि. १९/०२/२०१८ व दिनांक २०.२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली होती. त्यानुसार सदर उदयोगास बजावण्यात आलेल्या उत्पादन बंदीच्या निर्देशास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २२.२.२०१८ रोजी तात्पुरती स्थगिती दिली असून दंडात्मक कारवाई म्हणून बँक गॅरंटी जप्त केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारज्ञानाचा अभाव असल्याबाबत

**(३६) * १०४७७३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यांची वाढ झाली असली तरी व्यवहारज्ञानाचा अभाव असल्याचे तसेच विद्यार्थ्यांना राज्याची राजधानी तसेच भारताच्या नकाशावर महाराष्ट्राची

ओळख सांगता आली नसल्याचे एका संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाद्वारे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील काही निवडक शाळामध्ये शिक्षणाचा दर्जा तपासण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक व अनुसंधान परिषद यांनी सन २०१७ मध्ये ३ री, ५ वी व ८ वीच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय संपादक चाचणी घेतली असता त्यामध्ये यवतमाळ जिल्हा शिक्षणाच्या बाबतीत सर्वात मागे असल्याचे ॲकेडमीक ॲथेरेटी पुणे यांच्या निकालामध्ये दिसून आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यासह देशातील अनुदानित सरकारी शाळांमध्ये विविध इयत्तेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची केंद्र शासनामार्फत माहे नोव्हेंबर २०१७ वा त्या दरम्यान राष्ट्रीय शैक्षणिक व अनुसंधान परिषदेच्या माध्यमातून "नॅशनल अचिव्हमेंन्ट सर्व्हे" च्या अनुषंगाने करण्यात आलेल्या गुणवत्ता चाचणीच्या सर्व्हेमध्ये इतर राज्यांच्या (दाक्षिणात्य राज्यांच्या) तुलनेत महाराष्ट्रातील विशेषत: प्रगत शहरातील मुंबई, नागपूर हे जिल्हे शेवटच्या क्रमांकावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शासन स्तरावरून शाळा सिध्दी, शिक्षणाची वारी, बहुआयामी प्रशिक्षण यांचा वापर करून शिक्षणाचा स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला जात असतांना जिल्हयातील शिक्षकांना मुलांना शिकविण्याबाबत अनास्था असल्याने जिल्हयातील शिक्षणाचा दर्जा खालावला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केज, अंबाजोगाई व बीड (जि.बीड) तालुक्यातील गावामध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजनेची अनेक कामे बंद असल्याबाबत

**(३७) * १११५७६ श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज, अंबाजोगाई व बीड (जि.बीड) तालुक्यातील अनेक गावांमध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेतर्गत पाणीपुरवठा योजनेची अनेक कामे अपूर्ण असल्यामुळे गावातील पाणीपुरवठा बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर तालुक्यातील ग्रामीण भागात काही कामे निधी अभावी व सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी अपूर्ण अवस्थेत आहेत त्यामुळे, उक्त तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरीकांचे पाण्याअभावी हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांकडे योजनेची कामे पूर्ण करण्याची वेळोवेळी मागणी करूनही शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार उक्त तालुक्यांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत व सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सन २०१७-१८ मधील तालुकानिहाय उद्दीष्टांपैकी तीन तालुक्यातील १२ योजनांपैकी केज-०२, अंबाजोगाई-०१ व बीड तालुक्यातील-०२ योजना पुर्ण आहेत. उर्वरीत ७ योजना प्रगतीपथावर आहेत.

टंचाई कालावधीमध्ये विहीर अधिग्रहण, बोअर अधिग्रहण व आवश्यकतेनुसार टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो.

(३) व (४) सन २०१७-१८ चे नियतव्ययानुसार निधी उपलब्ध आहे.

त्याअनुषंगाने सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कोल्हापूर सह मुंबईतील पश्चिम उपनगरातील विनाअनुदानित शाळांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(३८) * १०९७०५ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोल्हापूर सह मुंबईतील पश्चिम उपनगरातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिकच्या सुमारे ७ हजार शाळांमधून काम करीत असलेल्या १ लाख शिक्षकांचा अनुदानाचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील अनुदान निकषासाठी मूल्यांकन होऊनही नव्या संचमान्यतेच्या निकषांमूळे विनाअनुदानित शाळांचे अनुदान प्रलंबित असल्याने शिक्षकांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यात विनाअनुदानित शाळांना अनुदान देताना सदर निधी पंचवार्षिक योजनांतर्गत निधी दिला जात असून पंचवार्षिक योजना संपल्यानंतर सदर शाळा योजनाबाहय व कृती आराखडा बाहय करुन त्यांना नियमित निधी मंजूर केला जातो, मात्र सन २००७ ते २०१२ व २०१२ ते

२०१७ या १० वर्षापासून अनुदान मंजूर झालेल्या शाळा कृती आराखडयामध्ये असल्यामुळे त्यांच्या नियमित वेतनामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक तुटपुंज्या वेतनावर काम करीत असून त्यांना वेतनही वेळेवर मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, मुंबईतील पश्चिम उपनगरातील काही विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक व विद्यार्थी यांनी १०० टक्के अनुदानाच्या मागणीसह बायोमेट्रिक हजेरीचा निर्णय मागे घेण्यासाठी काळया फिती लावून शासनाचा निषेध केला असल्याचे दिनांक ४  जानेवरी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार  राज्यातील सर्व विनाअनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान देण्यासह बायोमेट्रिक हजेरीची पध्दत बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही. दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना शासन निर्णय, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये  २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले. तसेच,दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये पात्र शाळांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे.  त्यामध्ये कोल्हापूर सह मुंबईतील पश्चिम उपनगरातील पात्र शाळांचा देखील समावेश आहे.

(२) नाही. शासनपत्र दिनांक २५ जानेवारी, २०१७ नुसार सन २०१५-१६ च्या संचमान्यतेनुसार मंजूर असलेल्या पदांनाच  अनुदान अनुज्ञेय आहे.

(३) व (४) नाही. वित्त विभागाच्या दिनांक २७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयानुसार वेतनाच्या सर्व बाबी या अनिवार्य खर्चामध्ये समाविष्ट करण्यात आल्या असून योजनांतर्गत व योजनेतर ही संकल्पना संपुष्टात आली आहे. तसेच, अनिवार्य खर्चामधील वेतन तरतूद कमी पडत असल्यास उणे प्राधिकाराने वेतन काढण्याची सुविधा बीम्स प्रणालीवर उपलब्ध असल्याने

वेतनाकरिता निधीची कोणतीही अडचण नाही. प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस वेतन होणेकामी विभागाने शासन परिपत्रक दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ अन्वये सूचना दिलेल्या आहेत.

(५) होय. शासन निर्णय, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये अनुदान पात्र शाळा व तुकडयांना शासनाच्या पुढील आदेशापर्यंत सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान अनुज्ञेय करण्यात आले आहे. तसेच, शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये वक्तशीरपणा राखण्याच्या दृष्टीने बायोमेट्रीक हजेरीचा समावेश सदर शासन निर्णयात करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांना दोन महिन्यांचे स्वस्त धान्य मिळाले नसल्याबाबत

**(३९) * ११३२८८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त १४ जिल्हयातील शेतकऱ्यांना २ रूपये दराने गहू व ३ रूपये दराने तांदूळ देण्याचा निर्णय शासनाने जुलै २०१५ मध्ये घेऊन त्यानुसार औरंगाबाद जिल्हयासाठी गहू व तुरडाळ याचा पुरवठा करण्यात आला असता जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याच्या दिरंगाई आणि निष्काळजीपणामुळे औरंगाबाद जिल्हयातील दुष्काळग्रस्त ५ लाख ६७ हजार शेतकऱ्यांना माहे मे, २०१७ आणि माहे जून, २०१७ या दोन महिन्यांत धान्य देण्यात आले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळग्रस्त ५ लाख ६७ हजार शेतकऱ्यांना वाटप करावयाचे ५६ हजार ७०० क्विंटल धान्य सरकारी गोदाममध्ये पडून होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार या प्रकरणी संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) माहे मे, २०१७ करीता औरंगाबाद जिल्हयाकरिता आवश्यक असलेल्या १५,३९६ क्विंटल गव्हापैकी १४,१२४.७८ क्विंटल गहू व ९,९९४ क्विंटल तांदुळापैकी ९५५०.०२ क्विंटल तांदुळाचे वाटप समायोजनाने शिल्लक अन्नधान्यातून करण्यात आले आहे.

माहे जून, २०१७ च्या अन्नधान्याची भारतीय अन्न महामंडळाकडे वेळेत मागणी करूनदेखील त्यांनी अन्नधान्याची उचल दिली नाही. त्याबाबत भारतीय अन्न महामंडळाशी जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद व शासनाकडून पाठपूरावा करूनदेखील सदर अन्नधान्याची उचल देण्यात आलेली नाही. औरंगाबाद जिल्हयाकरीता त्यापुढील महिन्यांकरीता देण्यात आलेल्या नियतनापैकी वाटपानंतरच्या शिलकीतून सदर अन्नधान्याचे वाटप सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) माहे मे व जून, २०१७ च्या अन्नधान्याचे वेळेत वाटप झाले नसल्याबाबतच्या प्रकरणी अपर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यात विनापरवाना नशेच्या आणि गुंगी आणणाऱ्या औषधांची विक्री होत असल्याबाबत

**(४०) * १०६३९४ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यात विनापरवाना नशेच्या आणि गुंगी आणणाऱ्या औषधांची विक्री होत असल्याचे माहे नोव्हेंबर. २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाटल्यांवरील लेबल काढून नशेच्या औषधांची विक्री होत असलेल्या ठिकाणी अन्न व औषध प्रशासन निरीक्षक आणि पुणे ग्रामीण पोलीस यांनी छापा टाकून मोठया प्रमाणावर साठा जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुसार विनापरवाना नशेच्या आणि गुंगी आणणाऱ्या औषधांची विक्री करणाऱ्या संबधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, जुन्नर पुणे येथे एका इसमाच्या घरात विनापरवाना नशेच्या आणि गुंगी आणणाऱ्या औषधांचा साठा केल्याचे दि.०२.११.२०१७ रोजी निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) दिनांक ०२.११.२०१७ रोजी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी व जुन्नर पोलिसांनी सदर व्यक्तिच्या घरी छापा टाकून नशेच्या आणि गुंगी आणणाऱ्या औषधांचा रु.११०० चा साठा जप्त केला. प्रशासनाकडून औषधांचा विश्लेषण अहवाल प्राप्त करुन घेण्यात आला असून याबाबत अधिक चौकशीसाठी तो पोलिसांना देण्यात आला आहे. पोलिसांकडून संबधितांवर दिनांक ०२.११.२०१७ रोजी गुन्हा क्र. २०३/१७ नोंदविण्यात आला असून प्रशासनाकडून तसेच पोलिसांकडून याबाबत कार्यवाही चालु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पळसोशी, कांबरे वे.खो., महुडे बु., पाले व वडतुंबी (ता.भोर, जि.पुणे) या गावांमध्ये नळ पाणी पुरवठा योजनांना मंजूरी मिळणेबाबत

**(४१) * ११२१३८ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळसोशी, कांबरे वे.खो., महुडे बु., पाले व वडतुंबी (ता.भोर, जि.पुणे) या गावांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात नळ पाणी पुरवठा योजनांना मंजूरी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, पुणे यांना दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी विनंतीपत्र देवूनही अद्यापपर्यंत त्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उन्हाळयात होणारी पाणी टंचाई लक्षात घेता या गावांना तात्पुरत्या स्वरुपात नळ पाणी पुरवठा योजनांना निधीसह मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनधिंनी जिल्हाधिकारी पुणे यांना दि. ०९/०१/२०१७ रोजी दिलेल्या लेखी पत्रातील गावे/ वाड्या यांची क्षेत्रीय स्तरांवर उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग भोर यांनी पहाणी करुन अहवाल सादर केला होता. त्यानुसार पळसोशी, महुडे बु. पाले या गावांना तात्पुरते नळ पाणी पुरवठा योजना करणे करिता पुरवणी टंचाई आराखड्यामध्ये समावेश करण्यात आला होता. तथापी आराखड्यातील प्रस्तावांची मंजुरी होणेपूर्वी पावसाळा सुरु झाल्याने कामाची अंमलबजावणी होऊ शकली नाही.

(२) सन २०१७-१८ टंचाई आराखड्यात सदरची नावे समाविष्ट करणेत आलेली आहेत. त्यापैकी मौजे कांबरे वेखो, पळसोशी, पाले, महुडे, बु या गावांची अंदाजपत्रके जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करणेत आलेली आहेत. तसेच मौजे वडतुंची गावाचे नळपाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी निधी मंजूर असून ते जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण करणेत येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पालीदेवद (सुकापूर) (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायती अंतर्गत पाणी पुरवठा समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत

**(४२) * १०५८६८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालीदेवद (सुकापूर) (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायतीअंतर्गत स्थापन केलेल्या पाणी पुरवठा समितीने केलेल्या गैरव्यवहाराची रायगड जिल्हा परिषद प्रशासनाकडून नियुक्त केलेल्या समितीने केलेल्या चौकशीअंती अनियमितता आढळून आल्याने सदर समिती बरखास्त करून समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्यावर तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सचिव, गृह विभाग, यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक बाबतीत पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष व सचिव यांनी गैरव्यवहार करून नागरीकांची फसवणूक तसेच करोडो रूपयांचा महसुल बुडवून शासनाची दिशाभुल केल्याचे चौकशी समितीच्या निर्णयात उल्लेख केल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्यावर अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शासनाचा करोडो रूपयांचा महसुल बुडवणाऱ्या व शासनाची फसवणूक करणाऱ्या पाणी पुरवठा समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्यावर तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) सदर निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे
(३) होय, हे खरे आहे.
(४) पालीदेवद (सुकापूर) पाणी पुरवठा योजनेच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरीता उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या चौकशीमध्ये ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडून अनियमितता झाल्याचे आढळून आले. चौकशी समितीच्या निर्णयानुसार वसुलीची रक्कम महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम १२९(४) अनुसार समितीचे पदाधिकारी व सदस्य यांची जंगम मालमत्ता जप्त करुन वसुल करावी किंवा ग्राम विकास विभागाच्या दिनांक १२ जून, २०१३ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधितांवर फौजदारी कारवाई करावी अशा सुचना ग्रामपंचायतीस देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासनाने राज्यात नवीन ६२ महाविद्‌यालये सुरु करण्याचा घेतलेला निर्णय

**(४३) * ११२५९८ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद),**

**श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल मोटे (परांडा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यात नवीन ६२ महाविद्यालये सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन महाविद्यालये सुरु करण्यासाठी कोणते निकष निश्चित करण्यांत आले आहेत,

(३) असल्यास, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने महाविद्यालये सुरु करण्याबाबतचा बृहत आराखडा सर्व विद्यापिठाकडून मागविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोणकोणत्या विद्यापीठाकडून असा बृहत आराखडा शासनाला प्राप्त झाला आहे, असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या बृहत आराखाडयानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) शासन निर्णय दि. १५.०९.२०१७ अन्वये निकष विहित करण्यात आले आहेत.

(३) होय.

(४) व (५) सर्व अकृषी विद्यापीठांकडून बृहत आराखडा शासनास प्राप्त झाला असून आवश्यकतेप्रमाणे बिंदू निश्चित करुन महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाने (माहेड) त्यास मान्यता दिलेली आहे व त्याप्रमाणे संबधित अकृषी विद्यापीठांनी जाहीरात प्रसिध्द करुन शासनास प्राप्त झालेले प्रस्ताव छाननी करुन सादर केलेले आहेत. यासंदर्भात प्रचलित निकषाप्रमाणे व अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपनीकडून होणारे प्रदुषण

**(४४) * १०६१३५ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीमधील फेज नं.२ येथे व्हीएनएस इंडस्ट्रीज ही इंजनिअरींग कंपनी असून तेथील पिंपळेश्वर मंदिर परिसरात कंपनीकडून पर्यावरण आणि प्रदुषणाच्या सर्व नियमांचे उल्लंघन करुन कंपनीतील रसायन आणि प्लॅस्टिकचा कचरा जाळला जात असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्रदुषण महामंडळाला प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसी परिसरात असलेल्या अनेक कंपन्यांमूळे निर्माण होणा-या धूर व कचरा याच्या प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रदुषण मंडळाने २०० मीटर अंतरावर प्रदुषण मॉनिटरी मशिन बसविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रदुषण करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत वसदर कंपन्याविरुध्द आतापर्यंत काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) अंशत: खरे आहे. दि.०४.०१.२०१८ रोजी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांची पाहणी केली असता सदरहू कंपनी प्लास्टिक तथा लाकडी भूसा कपडयाची चिंधी याप्रकारचा कपडा जाळत असल्याचे आढळून आले. नागरिकांकडून अशी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) होय.

(३) सदरहू कंपनीला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ०४.०१.२०१८ रोजी उत्पादन बंद चे आदेश बजावलेले होते तसेच त्या परिसरातील दोन

उद्योगांना दिनांक ०९.१०.२०१७ रोजी उत्पादन बंद चे आदेश बजाविण्यात आले. उद्योगाने त्या अनुषंगाने केलेल्या उपाययोजनांचा विचार करुन मंडळाने विहीत केलेल्या अटी व शर्ती नुसार उत्पादन पुन:श्च सुरु करण्याबाबतचे दिनांक ०७.०२.२०१८ रोजी आदेश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासनाच्या नीरी या संस्थेतर्फे केलेल्या ध्वनीप्रदूषित शहरांमध्ये सोलापूरचा तिसरा क्रमांक असल्याबाबत

**(४५) * १११४९६ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नीरी या संस्थेतर्फे चार महिन्यांपूर्वी केलेल्या निरीक्षणांमध्ये राज्यातील ध्वनीप्रदूषित शहरांमध्ये सोलापूरचा तिसरा क्रमांक असून त्यामुळे सोलापूर शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर येथील प्रदुषण नियंत्रण करणाऱ्या यंत्रणा निष्क्रीय आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शससनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर शहरातील प्रदुषण नियंत्रीत करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही. तथापी निरी या संस्थेकडून सोलापूर शहरातील ध्वनी प्रदूषणाचे मोजमाप करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाघोली (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथे शौचालयाच्या बांधकामात गैरव्यवहार झाला असल्याबाबत

**(४६) * १०९००१ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (ता.मोर्शी, जि.अमरावती) या ग्रामपंचायतीला स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत ५७ शौचालयाच्या बांधकामाकरीता रुपये ६ लक्ष ८४ हजार धनादेशाद्वारे प्राप्त झालेले असून यामध्ये शौचालयाचे अर्धवट बांधकाम तर कुठे बांधकामच न करता निधी देण्यात आल्याचे तसेच दुसऱ्या व्यक्तींच्या नांवे बांधलेले शौचालय दाखवून गैरव्यवहार झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामाची विस्तार अधिकाऱ्यांनी चौकशी केली असतांना वाघोली ग्रामपंचायतीचे तत्कालीन सरपंच, सचिव हे दोघे दोषी असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी गट विकास अधिकारी पंचायत समिती मोर्शी यांनी केलेल्या चौकशी अहवालानुसार एकूण ४ अपात्र लाभार्थ्यांना शौचालयबांधकाम प्रोत्साहनपर रक्कम वितरीत केल्याने शासनाच्या एकूण रू.४८,०००/- इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले. तसेच शहीद भगतसिंग बहुद्देशिय संस्था, उदखेड यांना शौचालय बांधकामासाठी एकूण रू.१,२०,०००/- इतकी रक्कम नियमबाहय अदा करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती यांनी दिनांक ०७.१२.२०१७ च्या पत्रान्वये ग्रामपंचायत वाघोलीचे तत्कालिन

सचिव श्री. एस.आर. वाघ व सरपंच श्रीमती अर्चना सुनील पोहोकार यांचेवर जबाबदारी निश्चित केली आहे. त्यानुसार गट विकास अधिकारी पंचायत समिती मोर्शी यांनी संबंधितांवर वसुलीची तसेच प्रशासकीय कारवाई सुरू केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील रात्रशाळा शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या विविध परिपत्रकामुळे संभ्रमावस्थेत असल्याबाबत

**(४७) * १०४९९७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रात्रशाळेबाबत शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या विविध परिपत्रकामुळे शिक्षकांमध्ये संभ्रमावस्था असून सदर शासन निर्णयान्वये दिवस शाळा व रात्रशाळा अशा दोन्ही ठिकाणी काम करणाऱ्या शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दुबार नोकरी करता येणार नाही, असा निर्णय घेतलेला असून याबाबत मा.उच्च न्यायालयाने शासनाने घेतलेली भूमिका योग्य असल्याचे दिनांक १६ जून, २०१७ च्या न्याय निर्णयात मान्य केले असल्याने, रात्रशाळेतील मुख्याध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शाळा सुरु करण्यापासून तसेच शाळा व्यवस्थापनापासून ते शैक्षणिक कामापर्यंत

सर्वच जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रात्रशाळांना कायमस्वरूपी शिक्षक देण्याबाबत लवकरच उपाययोजना केल्या जातील असे आश्वासन देवूनही त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात आली नसल्याने, गत सहा महिने मुंबईतील रात्रशाळा ह्या मुख्याध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांशिवाय चालू आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील संच मान्यतेमध्ये अर्धवेळ शिक्षक दर्शविण्यात येत नाहीत व वेतन देयके पारित होत नाहीत, त्यामुळे राज्यात अर्धवेळ शिक्षकांच्या नोकरीचा व सेवा शाश्वतीच्या अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले असून ९ तासापेक्षा अधिक कार्यभार असणाऱ्या रात्रशाळेतील शिक्षकांना पूर्णवेळ शिक्षकांचा दर्जा देणे, त्यांना वैदयकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळणे,रात्रशाळेचा कार्यकाल साडेतीन तास करणे, आदि बाबी नमूद करणारे रात्रशाळा धोरण शासनाने जाहीर केले असूनही त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, रात्रशाळेत अर्धवेळ काम केलेल्या व शासनाने पूर्णवेळ रात्रशाळेचा दर्जा दिलेल्या रात्रशाळांमधील शिक्षकाचे वेतन काढण्याचा अधिकार मुख्याध्यापकाकडे असून बहुतेक शाळांमधील शिक्षकांचे सुमारे ४ ते ५ महिन्याचे वेतन प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) दि.२३.६.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार शिक्षण सेवक भरतीबाबतची कार्यवाही सुरु आहे.

शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे याबाबत आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) रात्र कनिष्ठ महाविद्यालयातील दुबार सेवा करणाऱ्या शिक्षकांच्या सेवा समाप्त करण्यात आलेल्या होत्या, तथापि विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर

परिणाम होवू नये म्हणून आवश्यक तेथे त्यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात पुन्हा चालू ठेवण्यात आल्या, मात्र तत्पूर्वी त्यांच्या नावाचा अंतर्भाव शालार्थ वेतनप्रणालीतून वगळल्यामुळे तसेच काही रात्रशाळेनी वेतनाची देयके विलंबाने सादर केल्याने, सेवासातत्य मिळालेल्या शिक्षकांचा अंतर्भाव शालार्थ वेतनप्रणाली नव्याने करण्यात आल्याने व शालार्थ वेतनप्रणाली सद्यस्थितीत तांत्रिक कारणास्तव सुरु नसल्याने अशा शिक्षकांच्या वेतनाची देयके प्रलंबित आहेत. याबाबत ऑफलाईन पध्दतीने वेतन अदा करण्याकरिता परवानगी दिली आहे.

दि.१७.५.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीबाबत महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ नुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ आणि जळगाव येथील शासकीय गोदामात झालेल्या धान्य गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(४८) * ११३२८९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंबा कळवा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ आणि जळगाव येथील शासकीय धान्य गोदामात स्वस्त धान्य दुकानदारांना वाटप करण्यात येणाऱ्या लाखो रूपयांच्या धान्याची साठवणूक केल्यानंतर पुरवठा अधिकारी आणि तेथील कर्मचाऱ्यांच्या संगनमताने धान्याचा मोठया प्रमाणात गैरव्यवहार करून खुल्या बाजारात विक्री होत असून लाखो रूपयांचा गैरव्यवहार केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी लोकप्रतिनिधींव्दारे वारंवार तक्रार करूनही अदयाप चौकशी केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अचानक गोदामामध्ये धाड टाकून तपासणी केली असता मोठया प्रमाणात होत असलेला गैरप्रकार आढळून आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची उच्च स्तरीय अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३), (४) व (५) श्री.एकनाथराव खडसे व श्री.संजय सावकारे, मा. वि.स.स. यांनी दि.१९.०१.२०१८ रोजी भुसावळ येथील गोदामास अचानक भेट देवून पाहणी केली असता सदर पाहणीत काही त्रुटी आढळून आल्या. त्याअनुषंगाने जळगाव जिल्हयातील सर्व शासकीय गोदामांची तपासणी नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई, तथा राज्यस्तरीय दक्षता पथक प्रमुख, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई व विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या पथकामार्फत दि.२०.०१.२०१८ ते दि.२९.०१.२०१८ या कालावधीत करण्यात आलेली आहे. सदर तपासणीत भुसावळ, चाळीसगाव, मुक्ताईनगर व कुऱ्हा काकोडा येथील गोदामात पुस्तकी शिल्लकेशी मेळ घातला असता गोदामातील प्रत्यक्ष साठयात तफावत आढळून येणे, गोदामात अप्रमाणित धान्य साठा असणे इ. त्रुटी आढळून आल्या आहेत.

सदर त्रुटींच्या अनुषंगाने या गोदामांतील दोन गोदाम व्यवस्थापक व दोन गोदामपाल यांना निलंबित करण्यात आले असून दोन पुरवठा तपासणी अधिकारी, तीन पुरवठा निरीक्षक यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच एक पुरवठा निरीक्षक यांचे विरुध्द तात्पुरती एक वेतनवाढ बंद करणे प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

उर्वरित १३ गोदामात धान्याच्या थप्पीवर नमुन्यातील बिनकार्ड लावलेले नसणे, सर्व योजनांचा गहू व तांदूळ यांचा साठा गोदामात एकत्रित ठेवणे, धान्याच्या दोन थप्पीमध्ये पुरेसे अंतर ठेवलेले नसणे अशा प्रकारच्या

किरकोळ स्वरुपाच्या त्रुटी असल्याने संबंधितांचा खुलासा मान्य करुन त्रुटी दुरुस्त करण्यासंदर्भात आदेशित करण्यात आलेले आहे.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यासह तसेच नाशिक, रायगड जिल्हापरिषदेच्या शाळेत पोषण आहार बंद असल्याबाबत

**(४९) * १०५७८९ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यासह जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या १३९ शाळांमधील पोषण आहार बंद असून पुरवठादाराकडून धान्यादी मालाचा वेळीच पुरवठा केला जात नसणे, स्वयंपाकी मानधन,इंधन मानधन वेळीच प्रदान न करणे, धान्यादी माल मोजमाप करून न देणे अशाही परिस्थितीत शालेय पोषण आहार ही कल्याणकारी योजना सुरळीत चालू राहावी यासाठी शिक्षक स्वखर्चाने ही योजना चालवित असून केवळ शालेय पोषण आहाराची माहिती ऑनलाईन भरली नाही म्हणून शिक्षण उपसंचालक, सिंधुदुर्ग यांनी गत ८ महिन्याचे शालेय पोषण आहार इंधन मानधन रोखून ठेवले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाशिक जिल्हा परिषदेच्या शाळेत शालेय पोषण आहार बंद करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्याचा जिल्हा परिषद शिक्षण समितीने निर्णय घेवूनही या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना देण्यात येणारा पोषण आहार गत तीन ते चार महिन्यांपासून शासनाच्या निविदा प्रक्रियेत असल्यामुळे तसेच पोषणहाराची

रक्कम शिक्षकांपर्यंत पोहचत नसल्याने गेल्या पाच महिन्यांपासूनची जिल्हा फंडात जमा झालेल्या सात कोटी रुपयांचा अनियमित व्यवहार झाल्याचे व विद्यार्थ्यांना उधारीवर शालेय पोषण आहार पुरविला जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ व जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पनवेल (जि.रायगड) तालुक्यात परिषदेच्या २०० ते २५० शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या आठ हजारांहून अधिक गरिब-गरजू आदिवासी पाडयातील विद्यार्थ्यांना पोषण आहारापासून वंचित रहावे लागत असल्याने माहे ऑक्टोबर महिन्यापासून विद्यार्थ्यांना पोषण आहार पुरविण्याची जबाबदारी शाळांवरच सोपविण्यात आली असून प्रत्येक महिन्याला ९ क्विंटल तांदूळ व १५० किलो डाळ व विविध अन्नधान्य पुरविणे तसेच बचत गटांच्या माध्यमातून खिचडी पुरविण्यासाठी धान्य शिजवणाऱ्या महिलांना मानधन देण्यात अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पोषण आहार सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाचीकारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) वेंगुर्ला जि.सिंधुदुर्ग येथील १३६ शाळांपैकी १३ शाळांमध्ये काही दिवस आहार शिजविण्यात आलेला नाही.

योजनेतील स्वंयपाकी तथा मदतनीस यांचे माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले असून यापुढील देयक अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार इंधन व भाजीपाला यांची देयके जिल्हास्तरावरुन थेट लाभार्थ्यांच्या खात्यात ऑनलाईन पध्दतीने अदा करणे आवश्यक आहे. यासाठी योजनेच्या पोर्टलवर शाळांनी माहिती भरल्यानंतर देयके तयार होतात. त्यानुसार वेंगुर्ला तालुक्यातील इंधन-भाजीपाला यासाठीचे अनुदान माहे ऑगस्ट, २०१७ पर्यंत अदा करण्यात आले असून यापुढील अनुदान अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत धान्यादी मालाची खरेदी करण्यासाठी संबंधित शाळेच्या अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांवर जबाबदारी देण्यात आली होती. तांदळाचा पुरवठा पुरवठेदारामार्फत करण्यात येत होता. याअंतर्गत अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांनी १५ दिवसांकरिता धान्यादी माल खरेदी करुन शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पोषण आहार शिजवून द्यावयाचा होता. सदर १५ दिवसाची देयके मुख्याध्यापकांना सादर केल्यानंतर ती अदा करण्याची तरतूद करण्यात आली होती.यानुषंगाने अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांची रायगड जिल्हयातील माहे ऑगस्ट ते नोव्हेंबर, २०१७ ची देयके अदा करण्यात आलेली आहे.

माहे डिसेंबर, २०१७ पासून निविदेप्रक्रियेद्वारे नियुक्त पुरवठेदारामार्फत शाळास्तरावर तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येत आहे.

(५) सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये काही शाळांमध्ये शालेय पोषण आहार दिला नसल्याने याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे. तसेच, नाशिक जिल्हयामध्ये काही शाळांमध्ये शालेय पोषण आहार दिला नसल्याने संबंधितांवर कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईमध्ये अन्नसुरक्षा व मानके कायदयाचे उल्लंघन करणा-या अन्नपदार्थ विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत

**(५०) * १०५२१० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये अन्नसुरक्षा व मानके कायदा उल्लंघन करुन अन्नपदार्थ विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मोहीम अन्न व औषध प्रशासनाने हाती घेतल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये प्रामुख्याने फेरीवाले, फळविक्रेते, भाजीपाला विक्रेते इत्यादींकडून कायद्याचे उल्लंघन होत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्नपदार्थ विक्रेत्यांकडून कायदयाचे काटेकोरपणे पालन व्हावे व प्रत्येकाने परवाना घ्यावा यासाठी प्रशासनामार्फत मुंबईमध्ये विशिष्ट अशी ग्राहक-विक्रेता जनजागृती मोहीम शासनाकडून राबविण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) याबाबत अन्न व औषध प्रशासनामार्फत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

(४) अन्न व औषध प्रशासनामार्फत जानेवारी, २०१८ मध्ये विशेष मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. सदर प्रक्रिया निरंतर प्रक्रिया असून अन्न व औषध प्रशासनाकडून वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.